REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ७ फेब्रुवारी, १९४० अंक ६

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यांस हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

अप-टु-डेट शिलाईकरितां

## महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार चौक, पुणें

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडारा-चे माडीवर

# विविध माहिती

### विमाएजंटांचा लायसेन्स

नवीन विमा कायद्याचे अन्वयें विमा एजंटांना लायसेन्स घ्यावें लागणार आहे. हें लायसेन्स देण्यास सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला जरी विलंब लागला, तरी ज्यांचा अर्ज डिसेंबर १९३९ च्या आंत त्यांचे कचेरीकडे गेला असेल, त्यांच्या लायसेन्सवर १ जानेवारी, १९४० ही तारीख घातली जाईल.

### विमा कायद्याखालील कानू आणि लहान विमा कंपन्या

" नवीन विमा कायद्याचे अन्वयें विमा कंपन्यांना आपल्या जिंदगीपैकी फार मोठी रकम सरकारी रोख्यांत गुंतवावी लागणार आहे. विमा कायद्यांतील कडक अटी नवीन कंपन्यांवर बंधनकारक करण्यापूर्वी त्यांस दहा वर्षांपर्यंत मुदत द्यावी म्हणजे त्यांस आपले व्यवहार व्यवस्थित करण्यास सवड मिळेल, असें कायदा करतेवेळीं ठरलेलें आहे. प्रत्येक कंपनीनें पहिल्या वर्षाच्या हप्त्याचे उत्पन्नाच्या १०% आणि चालू हप्त्यांच्या उत्पन्नाच्या ७½% इतक्या रकमेंत कंपनीचा खर्च भागवला पाहिजे असें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचें म्हणणें दिसतें. तत्वतः हें कितीहि योग्य असलें, तरी निदान १०० हिंदी कंपन्यांचे बाबतींत तें व्यवहार्य ठरणार नाहीं. कायद्यांत अंतर्भूत असलेलें धोरण करण्यांत येत असलेल्या नियमांनीं बदललें जाणार नाहीं असें सरकारनें आश्वासन देणें आवश्यक आहे. ":—फेडरेशन ऑफ इंडियन इन्शुअरन्स कंपनीज्, न्यू दिल्ली, ह्यानें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे पाठविलेलें पत्र.

### रहाणीच्या खर्चाचे मानांत वाढ

जून, १९३४ मध्यें मुंबई शहरांतील कामगारवर्गाच्या रहाणीच्या खर्चाचें मान १०० होतें असें धरलें तर तें डिसेंबर, १९३९ मध्यें ११३ इतकें भरलें. म्हणजे, नोव्हेंबर, १९३९ च्या मानानें त्यांत ४ टक्क्यांनीं वाढ झाली.

### इटली

इटलीचें क्षेत्रफळ १ लक्ष, २० हजार चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ४३ कोटि आहे. वस्तीस पुरेसा वाव नसल्या-कारणानें सुमारें १ कोटि इटालियन लोक बाहेर देशीं गेलेले आहेत. ॲबिसिनिया पादाक्रांत केल्यामुळें इटलीस ३½ लक्ष चौरस मैल नवीन क्षेत्र मिळालें परंतु त्याबरोबर इतरहि अनेक प्रश्न उपस्थित झाले. लिबिया, इटालियन पूर्व आफ्रिका, इरिट्रिया, इटालियन सोमालीलँड, इत्यादि इटलीच्या वसाहती आहेत. इटलीमध्यें जननाचें दर हजार लोकवस्तीशीं प्रमाण २२·४ इतकें पडतें. इंग्लंडमध्यें तें १४·८ आहे. तथापि दर हजार लोकवस्तीशीं विवाहाचें प्रमाण दोन्ही देशांत सारखेंच आहे. इटली मुख्यतः रेयॉनचें सूत, नारिंगें, ताजीं फळें, दारू, टोमॅटो, इत्यादींची निर्गत करते. रोम, मिलन, नेपल्स, जिनोआ हीं इटलीमधील प्रमुख शहरें होत.

### शिमशा विद्युद्गृह

म्हैसूर संस्थानांतील शिमशा विद्युद्गृहामध्यें विजेच्या उत्पादनास मार्च, १९४० मध्यें प्रारंभ होईल, असें समजतें. कावेरी आणि शिमशा ह्या नद्यांचे संगमाजवळ शिमशापुरा येथें हें विद्युद्गृह उभारण्यांत येत आहे, त्यास सुमारें ४२ लक्ष रुपये खर्च येईल. ह्या योजनेमुळें म्हैसूर सरकारास दरसाल २० लक्ष रुपये उत्पन्न मिळेल.

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

एप्रिल ते डिसेंबर, १९३९ ह्या नऊ महिन्यांत, १९३८ च्या तत्सम मुदतीच्या मानानें, हिंदुस्थानाची आयात ७० लक्ष रुपयांनीं वाढली, म्हणजे तिची किंमत ११८ कोटि रुपये भरली. निर्गत २० लक्ष रुपयांनीं वाढून तिची किंमत १४७ कोटि रुपये भरली. आयात, निर्गत आणि आयातीची पुनर्निर्गत ह्यांच्या किंमतीची बेरीज २६५ कोटि रुपये, म्हणजे १९३८ च्या तत्सम आकड्यापेक्षां १४% अधिक झाली.

### औद्योगिक बांधे

सप्टेंबर, १९३९ अखेर संपलेल्या तिमाहींत ब्रिटिश हिंदुस्थानांत एकूण ११२ औद्योगिक बांध्यांत ९८ हजार कामगारांचे १७ लक्ष, ८५ हजार कामाचे दिवस बुडाले. त्या पूर्वीच्या तिमाहींत, १०९ बांध्यांत ९५ हजार कामगारांचे १५ लक्ष, ८० हजार कामाचे दिवस बुडाले होते. कपास कापडाच्या आणि तागाच्या गिरण्यांतच ह्यांपैकीं सुमारें ४४% बांधे झाले. एकूण ५२ बांधे मजुरीच्या वाढीबाबत होते.

### म्हैसूर येथें विमानगृह

म्हैसूर आणि नांजनगड ह्यांचे दरम्यान लवकरच एक विमानगृह तयार करण्यांत येणार आहे.

### दारूची आयात

गेल्या डिसेंबर महिन्यांत मुंबई प्रांतांत एकूण १ लक्ष, ९६½ हजार गॅलन दारूची आयात झाली. बंगालमध्यें १ लक्ष, ७२ हजार गॅलन दारू उतरली. ऑक्टोबर १९३९, आणि नोव्हेंबर, १९३९ ह्या दोन्ही महिन्यांत बंगालमध्यें मुंबई प्रांतापेक्षा अधिक दारूची आयात झाली होती.

### बिहारमधील उंसाची लागण

बिहारमध्यें ४ लक्ष, ४१ हजार एकर जमीन उसाखालीं आहे. गेल्या वर्षी ३ लक्ष, ७५ हजार एकरांत ऊंस लावलेला होता. १९२७ ते १९३६ ह्या मुदतीमधील लागणीची सरासरी ३ लक्ष, ३६ हजार एकर आहे.

### डिसेंबर १९३९ मधील बंगालची निर्गत

डिसेंबर १९३८ मध्यें बंगालनें जितक्या किंमतीच्या मालाची निर्गत केली, त्याच्या दुप्पट किंमतीच्या मालाची निर्यत त्यानें डिसेंबर, १९३९ मध्यें केली. ऑक्टोबर, १९३९ मध्यें बंगालची निर्गत ८४¾ लक्ष रुपयांची होती, ती नोव्हेंबर १९३९ मध्यें १ कोटीवर गेली आणि डिसेंबर, १९३९ मध्यें तर ती १ कोटि, ३८ लक्षांहून अधिक झाली. बंगालचे मानानें मुंबई आणि मद्रास ह्या प्रांतांचे निर्गतीचे आकड्यांत विशेष बदल झाला नाहीं.

### सिगारेट पेटींतील चित्रांचीं कार्डें

सिगारेट्सच्या पेटींत चित्रांचीं कार्डें घालण्याची पद्धति ब्रिटिश सिगारेट कारखानदारांनीं नुकतीच बंद केली आहे. दरसाल अशीं शेकडों कोटि कार्डें छापावीं लागतात, तें काम अर्थातच आतां बंद पडेल. जगांतील वेगवेगळ्या जातींचीं कुत्रीं, हिंदी संस्थानिक, नटनटी, ब्रिटिश आगबोटी, विमानें, इत्यादींचीं चित्रें बहुधा ह्या कार्डांवर असत.

### १४ वर्षांखालील मुलांस बंदी

१४ वर्षांखालील मुलांस सिनेमा अगर नाटकास जावयाचें असल्यास त्यांचेबरोबर त्यांच्या कुटुंबांतील मोठा मनुष्य, शाळेचा नोकर अगर दाई ह्यांपैकीं कोणीतरी असणें आवश्यक आहे, असा हुकूम कराचीच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें काढला आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६२ | ५ विमा खात्याँ फंड कसा गुंतवावयाचा ? ... | ६६ |
| २ फाजील नफ्यावर कर | ६३ | ६ "१९३९" ... | ६७ |
| ३ केरकपन्यांतील संपत्ति | ६४ | ७ मुंबई खात्यांतील प. व. डिपार्टमेंट ... | ६७ |
| ४ स्फुट विचार | ६५ | ८ भारतीय कला-वैभव प्रदर्शनाचें वर्णन ... | ६८ |
| स्थानिक स्वराज्य संस्थांचें स्थान-ह्या संस्थांची सांपत्तिक स्थिति-स्थानिक स्वराज्य संस्था समिति | | ९ रिझर्व्ह बँकेचे भाग धारण करण्याची मर्यादा ... | ६९ |
| | | १० निवडक बाजारभाव... | ७१ |



# अर्थ

बुधवार, ता. ७ फेब्रुवारी, १९४०


## फाजील नफ्यावर कर

हिंदुस्थान सरकारनें नवीन कायदा करून युद्धपरिस्थितीमुळें धंदेवाल्या व्यक्ती व मंडळ्या ह्यांस होणाऱ्या जादा नफ्यांतला निम्मा हिस्सा कर म्हणून घेण्याचें योजिलें आहे. युद्धामुळें किंमती चढून विशिष्ट प्रकारचा माल पुरवणारांस फाजील फायदा होतो आणि हा फायदा समाज व सरकार ह्यांच्यावर पडणाऱ्या बोजामधून उत्पन्न होत असल्यानें त्याचा निम्मा भाग राष्ट्रीय तिजोरीस मिळाला पाहिजे ह्या आशयाचें समर्थन नियोजित कराच्या बाजूनें पुढें मांडण्यांत आलें आहे आणि येईल. सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें फाजील नफ्यावरील कर आणि त्याचें समर्थन हीं सर्वस्वी योग्य आहेत, असें वाटण्याचा संभव आहे. सबब त्यांचा येथें थोड्या बारकाईनें विचार करणें अगत्याचें आहे. (१) नियोजित कराची आवश्यकता, (२) त्याचे स्वदेशी उद्योगधंद्यांवर होणारे बरे-वाईट परिणाम आणि (३) त्यांची आर्थिक व राजकीय बाजू, ह्या तीन दृष्टींनीं फाजील नफ्यावरील कराची छाननी केली पाहिजे. इंग्लंड किंवा दुसरा पाश्चात्य देश ह्यांमधील सरकारनें ह्या तऱ्हेचा कर बसवला आहे, तेव्हां हिंदुस्थानांतहि तो बसवण्यास हरकत नाहीं,हें सरकारकडून होणारें समर्थन मान्य होण्यासारखें नाहीं. ह्या देशाची राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिति इतर देशांशीं तुलना करतां अत्यंत भिन्न आहे, हें निर्विवाद असल्यानें परकीय राष्ट्रांचें अंधानुकरण येथें करणें चुकीचें होईल. हिंदुस्थानांत विशिष्ट प्रकारांच्या राजकीय व आर्थिक सुधारणा विषयींची मागणी लोकांनीं केली असतां येथील भिन्न परिस्थितीची व तीमुळें उद्भवणाऱ्या अडचणींची सबब पदोपदीं पुढें करण्यांत येते. तेव्हां जादा करांच्या बाबतींत मात्र इंग्लंडचें अनुकरण येथें कां ? करास संमति देण्याची अंतिम सत्ताहि हिंदी लोकप्रतिनिधींस नाहीं. फाजील फायद्यावर कर बसवण्याच्या अधिकाराचा अंतर्भाव हिंदुस्थानच्या घटना कायद्यांत ब्रिटिश पार्लमेंट परस्पर स्वतःच करीत आहे. मध्यवर्ती विधिमंडळांत लोकमत-प्रभावी होण्यास कॉंग्रेसचे प्रतिनिधि उपस्थित नाहींत आणि नियोजित कायद्याचा दूरगामी परिणाम प्रांतांवर व्हावयाचा असून तेथील राज्यकारभार सात प्रांतांत लोकांच्या हातीं आज नाहीं. ह्या स्थितींत हिंदुस्थानच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीवर दूरगामी परिणाम करणारा नियोजित कायदा औचित्याचे दृष्टीनें योग्य ठरत नाहीं.

कोणताहि जादा कर बसवला जाण्यापूर्वी सरकारच्या वाढलेल्या खर्चामुळें तो अपरिहार्य झाला असल्याचें सिद्ध झालें पाहिजे. हिंदुस्थान सरकार जे कर बसवतें, त्यांचा अंतर्भाव प्रतिवर्षी मध्यवर्ती असेंब्लीमध्यें पास होणाऱ्या फिनॅन्स ॲक्टांत करण्यांत येतो. दरवर्षी ह्या करांस लोकप्रतिनिधींची मान्यता पाहिजे, हा त्याचा अर्थ आहे. फाजील नफ्यावरील नियोजित कर हा स्वतंत्र रहाणार असून तो बसवणें व रद्द करणें ह्याचा वार्षिक फिनॅन्स ॲक्टाशीं संबंध रहावयाचा नाहीं. प्राप्तीवरील कराचे दर अलीकडे वाढवण्यांत आले आहेत आणि विशिष्ट मर्यादेपलीकडच्या मिळकतीवर सुपरटॅक्सहि घेण्यांत येत आहे. युद्धामुळें नफा वाढून व्यक्ती व कंपन्या ह्यांस फाजील प्राप्ती झाली, तर त्यांस त्या मानानें अधिक कर भरावा लागेलच. उद्योगधंदे व व्यापार ह्यांपासून होणाऱ्या नफ्याचा अंतर्भाव प्राप्तीवरील करास पात्र असलेल्या मिळकतीमध्यें केलेला असतो. तेव्हां, युद्धामुळें व्यक्तींस व मंडळ्यांस फाजील नफा होत असेल तर त्यांवर वरच्या दरानें त्यांस प्राप्तीवरील दर द्यावा लागेल आणि सरकारचें प्राप्तीच्या कराचें उत्पन्न वाढेल. युद्धपरिस्थितीच्या योगानें लोकांस होणाऱ्या फायद्यांतला वाढता अंश ह्या रीतीनें सरकारच्या तिजोरींत जाईल. ह्यासाठीं निराळा कर आणि निराळा कायदा करण्याचें प्रयोजन सरकारनें सिद्ध केलेलें नाहीं. युद्ध बरींच वर्षे चाललें आहे, हिंदुस्थान सरकारचा खर्च अतोनात वाढला आहे, आणि त्यांस नवे कर बसवून आपलें उत्पन्न वाढवल्यावांचून गत्यंतर नाहीं,असाहि प्रकार नाहीं. मध्यवर्ती सरकारनें कोणताहि कर बसवला तरी त्याचा परिणाम प्रांतिक सरकारांच्या सांपत्तिक स्थितीवर होत असतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नापैकी मोठा अंश आपणांस मिळाला पाहिजे अशी प्रांतिक सरकारांची मागणी आहे. तेव्हां त्या सरकारांचा अभिप्राय मध्यवर्ती सरकारनें नियोजिलेल्या नव्या कराबाबत घेतला जाणें आवश्यक आहे. लोकांकडून हिंदुस्थान सरकारनें जादा कर घेणें म्हणजे त्या लोकांची प्रांतिक सरकारांस कर देण्याची शक्ति कमी करणें होय हें येथें विसरतां कामा नये. युद्धामुळें प्रांतिक सरकारांचेहि खर्च वाढणार आणि त्यांचें प्रगतिकारक सुधारणेच्या योजना चालवण्याचें सामर्थ्य कमी होणार हें उघड आहे. युद्धपरिस्थितीचे सांपत्तिक परिणाम अजून स्पष्ट दिसावयासहि लागलेले नाहींत. जे दिसत व भासत आहेत ते मुख्यत्वेंकरून हिंदी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या मार्गांत येणाऱ्या अडचणींच्या स्वरूपाचे आहेत. धंदेवाले व मंडळ्या ह्यांच्या खिशांत फायद्याचा जोराचा ओघ वहात असून तो थांबवल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली आहे असें आज म्हणतां येत नाहीं. कोणत्या औद्योगिक मंडळ्या अवास्तव फायदा मिळवीत आहेत आणि आर्थिक मंदीमुळें कित्येक वर्षे झालेलें नुकसान भरून काढण्यास कोणत्या धंद्यांस कांहीं काळपर्यंत जादा नफा मिळणें आवश्यक आहे ह्याचा विचार झाला पाहिजे. युद्धपरिस्थितीचा फायदा स्वदेशी धंद्यांस मिळणार आहे आणि धंदेवाल्यांनीं ह्या संधीचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे असें एका बाजूनें म्हणावयाचें आणि दुसऱ्या बाजूनें

औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करील अशी कराची योजना अंमलांत आणावयाची हें धोरण युक्त नाहीं हें स्पष्ट आहे. जादा फायद्यावर स्वतंत्र कर बसवावयाचाच असेल तर त्याचा काळ अजून आलेला नाहीं आणि त्याची आवश्यकता सिद्ध झालेली नाहीं हें अनुमान वरवर पहाणारासहि मान्य झाल्यावांचून रहाणार नाहीं.

## केरकचऱ्यांतील संपत्ति

काटकसरी गृहिणीचें लक्ष घरांत नासधूस न होऊं देण्याकडे आणि प्रत्येक वस्तूचा अधिकांत अधिक उपयोग करून घेण्याकडे असतें. तोच नियम उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेस लागतो. कारखान्यांत उत्पादन होत असतांना कचरा निघतो, त्याचा दुसऱ्या एखाद्या प्रकाराचा माल बनविण्यांत उपयोग करतां आला तर ती गोष्ट फायद्याची आहे. मुख्य धंद्याच्या अनुषंगानें आणि त्यांचा किरकोळ भाग म्हणून दुय्यम धंदा किंवा धंदे त्या रीतीनें काढतां येतात. आधुनिक शास्त्रांच्या प्रगतीमुळे रद्दी जिनसांचा आणि कचऱ्याचा उपयोग ह्या रीतीनें वाढत्या प्रमाणावर करणें शक्य झालें आहे. अशा आनुषंगिक व दुय्यम उत्पादनाचा खर्च अर्थातच मर्यादेंत असणें आवश्यक आहे. तसें नसेल तर कचरा व रद्दी हीं उपयोगांत आणतां येणार नाहींत. कोळशाच्या खाणींत फुकट जाणारी भुकटी आतां उपयोगी पडूं लागली असून डांबर हें दुय्यम प्रकारच्या उत्पादनाचा परिणाम झाला आहे. लोखंडाच्या कारखान्यांत निघणारा वायू अलीकडे फुकट जात नाहीं. पोलादाच्या बनावटींत मोडक्या-तोडक्या लोखंडाचा व पोलादी मालाचा उपयोग होतो. अशा रद्दी लोखंड-पोलादास त्यामुळें चांगली किंमत येत आहे.

कापसाचें व लोकरीचें कापड, रबर व कागद त्यांच्या बनावटींत रद्दी मालास पुष्कळ महत्त्व प्राप्त झालें आहे. लोकरीच्या कापडाच्या बनावटींत जुने लोकरीचे कपडे उपयोगी पडतात. कागदाच्या कारखान्यांत रद्दी कागद व कापडाच्या चिंध्या वापरण्यांत येतात, हें प्रसिद्धच आहे. मोटारींच्या वगैरे जुन्या व निरुपयोगी रबरी धावांतून रबर काढण्यांत येऊन त्याचा पुन्हां उपयोग केला जातो. १९३८ सालीं अमेरिकेंत ४½ लक्ष टन कच्चें रबर तेथील कारखान्यांत वापरण्यांत आलें. त्याचे बरोबर वरीलप्रमाणें जुनें व रद्दी रबर उपयोगांत आणलें गेलें, त्याचें वजन सुमारें १½ लक्ष टन होतें. इतर धंद्यांत वापरण्यांत येणाऱ्या रद्दी मालाचे आकडे ह्याप्रमाणेंच देतां येतील. जुनें आणि मोडीचें लोखंड जमा करण्याचा धंदा बाहेरच्या देशांत मोठ्या प्रमाणावर चालतो. हिंदुस्थानांतील जरी पुराणवाले आणि रद्दी, कागद, बाटल्या, द्रवे जमा करणारे लोक त्यांच्या उद्योगाची दिशा व उपयोग काय आहे, त्याची वरील माहितीवरून कल्पना येईल.

इंग्लंड-वेल्समध्यें स्थानिक स्वराज्यसंस्थांचे केरकचरा निवडून त्यामधून उपयुक्त जिन्नस काढण्याचे ६५ कारखाने आहेत. ते प्रतिवर्षी १५ लक्ष टन कागद, ५० हजार टन लोखंड, पोलाद, केरामधून वांचवतात. मंदीच्या काळांत रद्दी मालास विशेष महत्त्व असतें. त्याचें कारण चांगल्या स्थितींतला कच्चा माल तेव्हां स्वस्त मिळूं शकतो. ह्याच्या उलट, चलतीच्या परिस्थितींत कचरा मालास तेजी येते आणि चांगल्या स्थितींतल्या कच्च्या मालास किंमती वाढल्यास प्रतिबंध होतो. युद्धकाळांत जुन्यापुराण्या व रद्दी मालास तेजी येणें स्वाभाविक आहे. इंग्लंडमध्यें असा माल गोळा होण्याचे संबंधांत सरकारनें एक खातें स्थापन केलें आहे आणि त्यानें जनतेमधील सर्व वर्गांस मालाची नासधूस न होऊं देण्याबाबत विनंति केली आहे. बालवीर संस्था स्वतः रद्दी कागद गोळा करण्याचे कामीं सहाय करीत आहे. कारखानदार आणि रसायनशास्त्रज्ञ ह्यांचें सहकार्य घेण्यांत येत आहे. ह्या सर्व प्रयत्नांचा परिणाम युद्धाची व्यवस्था कार्यक्षम करण्यास अनुकूल असा होतो. खाण्यापिण्याचे जिन्नस व कच्चा माल ह्यांचा काटकसरीनें उपयोग करणें हें युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांचें कर्तव्य असतें आणि युद्धपरिस्थितीमुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणींस तोंड देण्यासाठी इतर राष्ट्रांसहि ह्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. मानवी जीवनास आवश्यक व उपयुक्त असणाऱ्या वस्तू मुळांतच दुर्मीळ असल्यानें त्यांचा काटकसरीनें उपयोग करण्यांत शहाणपणा आहे. ह्या काटकसरीचें अगत्य युद्धकाळांत तर विशेष आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या सहायानें उद्योगधंद्यांत खर्चाची बचत होते. तिचा फायदा शांततेच्या काळांतहि लोकांस मिळतो. अडचणीच्या प्रसंगीं केलेल्या सुधारणा सुबत्तेच्या काळांतहि उपयोगी पडतात. (एकॉनॉमिस्टवरून)


**दी सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् अँण्ड बेरार**

**प्रॉव्हिन्शिअल् कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर सिटी.**

पैसे गुंतविण्यास उत्तम संधि — गहाणी कर्जरोख्यांची चतुर्थ आवृत्ति

व्याजाचा दर ४ ट. दरसाल दर शेकडा } रु. ५,००,००० { मुदत १५ वर्षे

दर्शनी किंमतीस विक्री

मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठी सरकारी पूर्ण हमी (Guarantee)

सहामाही व्याज

सविस्तर माहितीसाठी प्रसिद्धीपत्रक (प्रॉस्पेक्टस) मागवा.

जी. ए. भोसुले, मॅनेजर.

## स्फुट विचार

### स्थानिक स्वराज्य संस्थांचें स्थान

प्रत्येक राष्ट्रांत कारभाराच्या सोयीसाठी मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक अशा प्रकारची विभागणी राज्यव्यवस्थेच्या घटनेस अनुसरून केलेली असते आणि ती प्रभावी व्हावी म्हणून कर्तव्यें, अधिकार व उत्पन्न ह्यांची वांटणी ह्या विविध सरकारांमध्यें करण्यांत येते. त्याप्रमाणें मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक अशा तीन सत्ता हिंदुस्थानांत आहेत आणि राज्यकारभाराची व्यवस्था त्यांचेमध्यें वांटलेली आहे. ह्या सरकारांकडे त्यांचें स्थान व अपेक्षित कार्य ह्यांच्या दृष्टीनें विशिष्ट कारभार सोपविलेला असतो आणि त्यांच्या खर्चाकरितां उत्पन्नें तोडून दिलेलीं असतात. हिंदुस्थानांतील राज्यघटनेच्या इतिहासाचा हा विशेष आहे कीं, ब्रिटिश अमलांत सर्वसत्ता मध्यवर्ती सरकारांच्या हातीं मुळांत एकवटली होती आणि क्रमाक्रमानें ती प्रांतिक सरकार व स्थानिक स्वराज्य-संस्था ह्यांच्यामध्यें अधिकाधिक वांटण्यांत आली आहे. राष्ट्रसंरक्षण हें अत्यंत महत्त्वाचें काम राष्ट्रीय किंवा मध्यवर्ती सरकाराचें असून त्या मानानें त्याचें उत्पन्नहि मोठें असतें. प्रांतिक सरकारांस शांततारक्षण, शिक्षण इत्यादि कामें करावयाचीं असतात आणि त्यांच्या उत्पन्नाच्या बाबी प्रांतिक स्वरूपाच्या असतात. त्या मध्यवर्ती सरकाराप्रमाणें राष्ट्रव्यापी नसतात. स्थानिक स्वराज्य संस्था हा राष्ट्रीय राज्यव्यवस्थेचा पाया आहे. तथापि, ह्या देशांत लोकलबोर्ड्स व म्युनिसिपालिट्या ह्यांच्या जोपासनेकडे जावें तितकें लक्ष दिलें गेलें नाहीं. ग्रामसंघटन व स्थानिक स्वराज्य ह्या गोष्टी हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून अत्यंत प्रसिद्ध आहेत. परंतु ब्रिटिश राजवटींत नवीन राज्यपद्धतीच्या उत्क्रांतीच्या ओघांत त्यांची अनास्था होऊन गेली. साठ वर्षांमागें लॉर्ड रिपन ह्या गव्हर्नर जनरल यांच्या कारकीर्दींत त्यांच्या महत्त्वास मान्यता देण्यांत आली आणि स्थानिक सार्वजनिक गरजा लोकांनींच आपल्या अधिकारांत भागवणें अगत्याचें असल्याविषयींचें तत्त्व नमूद करण्यांत आलें.

---

### ह्या संस्थांची सांपत्तिक स्थिति

सामान्य जनतेच्या रोजच्या आयुष्यक्रमांत अत्यंत आवश्यकतेचीं कार्यें स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कक्षेंत येतात. पण म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्ड्स ह्यांच्या कारभारांत लोकनियुक्त सभासदांच्या हातीं सत्ता येण्यास कित्येक वर्षें लोटावीं लागलीं. ह्या संस्थांवर प्रांतिक सरकारचें नियंत्रण दीर्घकाळपर्यंत राहिलें आणि त्यांचें उत्पन्न मर्यादित राहिलें आहे. शिक्षण, आरोग्य, वहातुकीचे रस्ते इत्यादि खर्चाच्या महत्त्वाच्या बाबी त्यांचेवर सोपवलेल्या आहेत आणि तो खर्च भागवण्यास पुरेशा उत्पन्नाच्या बाबी मात्र त्यांच्या अधिकारांत नाहींत अशी शोचनीय स्थिति झाली आहे. स्थानिक संस्थांचा दर्जा व सत्ता हीं दुय्यम प्रतीचीं असल्यानें मध्यवर्ती व प्रांतिक सरकार आपापाल्या खर्चाची व उत्पन्नाची व्यवस्था सहज करतात पण म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्ड्स ह्यांची अबाळ होते. त्यांच्या कारभारांत सुधारणा व्हावी आणि त्यांची उपयुक्तता वाढावी असें सर्वांस वाटतें, पण ह्यासाठी आवश्यक असलेलें उत्पन्न कसें वाढवावें हें सहज सुचत नाहीं. स्थानिक संस्थांचीं उत्पन्नें बेताचीं असल्यानें त्यांस प्रांतिक सरकाराच्या द्रव्यसहायावर अवलंबून राहणें प्राप्त होतें. प्रांतिक सरकारासहि स्वतःच्या वाढत्या खर्चासाठी पैसा हवा असतो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांस ग्रँट्स देणें त्याच्या जिवावर येतें. ह्या संस्थांनीं जुने कर वाढवून किंवा नवे बसवून अधिक खर्च करावा आणि राज्यकारभार सुधारावा अशी प्रांतिक सरकाराची अपेक्षा असते. आपल्या उत्पन्नाच्या व बसवावयाच्या करांच्या मर्यादा अत्यंत आकुंचित असल्याविषयीं लोकल बोर्ड्स व म्युनिसिपालिट्या ह्यांची उलट तक्रार असते. ह्या परिस्थितीची चौकशी आणि तिच्यावर आधारलेल्या सूचना करण्यासाठी मुंबई सरकारनें प्रो. काळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली होती आणि तो रिपोर्ट गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाला.

---

### स्थानिक स्वराज्य संस्थासमिति

म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्ड्स ह्यांच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी नेमलेल्या ह्या काळेसमितीकडे ह्या संस्थांच्या कारभाराविषयींचे अनेक प्रश्न चौकशीसाठी सोपवण्यांत आले होते, तरी त्यांमध्यें सांपत्तिक बाबींस विशेष महत्त्व होतें. "सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः" ह्या न्यायानें स्थानिक संस्थांच्या व्यवस्थेची कार्यक्षमता त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असल्यानें मुंबई सरकारासहि ह्या सांपत्तिक प्रश्नाचा विचार व निकाल करून घेणें अगत्याचें वाटलें असावें ह्यांत आश्चर्य नाहीं. प्रांतिक सरकारानें आपणांस अधिक द्रव्यसहाय्य द्यावें अशी लोकल बार्ड्स व म्युनिसिपालिट्या ह्यांची अपेक्षा एका बाजूस आणि त्या संस्थांनीं सांपत्तिक बाबतींत स्वावलंबी होऊन स्वतःचा कारभार सुधारावा अशी प्रांतिक सरकाराची कल्पना दुसऱ्या बाजूस असा हा दुरंगी प्रश्न आहे. अनेक वर्षांच्या आर्थिक मंदीमुळें त्यास विशेष तीव्रता प्राप्त झाली आणि प्रांतिक सरकारानें सुधारणेच्या खर्चाच्या नवीन योजना हातीं घेतल्या कारणानें स्थानिक संस्थांस द्यावयाच्या द्रव्यसहायास बसलेल्या मर्यादा ह्या गोष्टी येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें आम्हीं वर प्रस्तुत प्रश्नाची पार्श्वभूमि थोडक्यांत मांडली आहे तीहि ध्यानांत बाळगणें अगत्याचें आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची असमाधानकारक सांपत्तिक स्थिति हा प्रश्न नवा नाहीं. कै. वा. नामदार गोखले ह्यांनीं कायदेमंडळांत वक्तृत्वपूर्ण वाणीनें व मुद्देसूद रीतीनें ह्या संस्थांची बाजू पुढें मांडल्यास अनेक वर्षें झालीं आहेत. काळेसमितीचें ह्या संबंधांत काय म्हणणें आहे आणि तिच्या कायसूचना आहेत, ह्याचें विवेचन पुढील अंकांत आम्हीं करणार आहोंत. समितीनें प्रस्तुत प्रश्नास योग्य तें महत्त्व दिलें असून कित्येक विधायक सूचनाहि केल्या आहेत.

---

### मॅजिनॉट

अँद्री मॅजिनॉटचा जन्म १८७७ सालीं झाला. तो फ्रेंच सैन्यांत दाखल झाला, तथापि गेल्या महायुद्धांत तो जखमी झाला. त्यानंतर त्यानें राजकारणांत लक्ष घालण्यास प्रारंभ केला. १९१७ सालीं तो वसाहत मंत्री झाला. १९२२ आणि १९२९ सालीं तो युद्धमंत्री झाला. फ्रेंच प्रेसिडेंट एम. पेनलीव्ह ह्यांचें सहायानें त्यानें मॅजिनॉट लाइनची योजना तयार केली. मूळ योजना १९३४ सालीं पुरी झाली, परंतु त्यापूर्वीच, १९३२ सालीं, मॅजिनॉट मरण पावला. तथापि युरोपियन संस्कृतीच्या रक्षणाचें काम त्यांची मॅजिनॉट लाइन आज प्रभावी रीतीनें करीत आहे.

---

## विमाखातीं फंड कसा गुंतवावयाचा ?

विमा कंपन्यांस त्यांच्या लाइफ अॅशुअरन्स फंडावर पडणाऱ्या व्याजाचे दरावरच त्यांची आर्थिक परिस्थिति अवलंबून रहाते. कांहीं विशिष्ट दरानें आपणांस आपले पैसे गुंतवितां येतील ह्या अपेक्षेनेंच कंपन्या हप्त्यांचे दर ठरवितात. अर्थात्, अपेक्षेप्रमाणें हें उत्पन्न आलें नाहीं तर विमाकरारांतील अटी पार पाडणें कंपन्यांस जड जाईल, हें उघड आहे. निदान, त्यांस मोठ्या प्रमाणावर बोनस वाटतां येण्याजोगी परिस्थिति रहाणार नाहीं.

लंडन अॅशुअरन्स कार्पोरेशनचे अॅक्चुअरी, मि. ए. एच. बेली, ह्यांनीं सुमारें ८० वर्षांपूर्वी, विमा खाती फंड कसा गुंतवावा ह्या संबंधीं आपले विचार सूत्रमय व्यक्त केले, ते अद्यापहि मार्गदर्शक होण्याजोगे आहेत ते म्हणतात:—

### महत्त्वाच्या सूचना

(१) पैशाची सुरक्षितता, ही गोष्ट सर्वांत अधिक महत्त्वाची आहे.

(२) अधिकांत अधिक व्याजाचा दर मिळविण्याचा यत्न करण्यांत यावा; अर्थात्, वरील पहिल्या नियमास बाध येतां कामा नये.

(३) एकूण फंडापैकीं कांहीं भाग, ज्या रोख्यांचें रूपांतर रोख रकमेंत तात्काळ करतां येईल, अशा रोख्यांत गुंतवावा; हेतु हा कीं क्लेमचे पैसे तावडतोब देतां यावे आणि पैसे गुंतविण्याचा चांगला मार्ग उपस्थित झाल्यास पैसा हाताशीं असावा.

(४) बाकीचा आणि फंडाचा अधिक मोठा भाग ज्याचे पैसे तात्काळ उभे करतां येणार नाहींत अशा ठिकाणीं गुंतविण्यास हरकत नाहीं.

(५) शक्य तोंवर विम्याचे कामास सहाय होईल अशा रीतीनेंच पैसे गुंतविण्यांत यावेत.

पैसे सुरक्षित गुंतवितांना (१) गहाणावर कर्ज आणि (२) लांब मुदतीचे कर्जरोखे हे प्रामुख्यानें नजरेस येतात. गहाणावरील कर्जाची फेड योग्य मुदतींत झाली नाहीं तर गहाण मालमत्ता विकण्यांत येते आणि ह्या मालमत्तेची मूळ कर्जाइतकी किंमत येतेच, असें नाहीं. लांब मुदतीच्या कर्जरोख्यांची बाजारांतील किंमत चढली अगर उतरली तर कंपनीचें त्यामुळें नुकसान होत नाहीं, कारण ठराविक मुदतीनंतर कंपनीस निश्चित रकम परत मिळणार असतेच. कंपनीचे पैसे एकाच ठिकाणीं न गुंतवितां ते शक्य तितक्या वेगवेगळ्या ठिकाणीं गुंतविणें श्रेयस्कर असतें. अधिकांत अधिक उत्पन्न येत राहील ह्या दृष्टीनें आपले पैसे वेगवेगळ्या ठिकाणीं पेरण्याचें धोरण कंपनीनें अंगिकारणें आवश्यक आहे.

### नवीन विमा कायदा

सन १९३८ च्या हिंदी विमा कायद्यानें विमा कंपन्यांनी लाइफ फंड गुंतविण्याबाबत महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. प्रत्येक कंपनीनें आपल्या विमेदारांच्या देण्यापैकीं ५५% रकम सरकारी रोख्यांत गुंतविली पाहिजे, असा पोटकलमांत, हा कायदा सांगतो. ह्यामुळें कंपन्यांस व्याज कमी मिळालें आणि त्याचा परिणाम बोनसचे दरावर झाला आणि अखेर कंपनीस हप्ते वाढवावे लागले, तरी कंपनीची मजबुती वाढविण्याचे दृष्टीनें ही तरतूद आवश्यक आहे, असेंच म्हटलें पाहिजे. आपले पैसे सुरक्षित राखण्याचें पहिलें, महत्त्वाचें काम सरकारी कर्जरोखे उत्कृष्ट रीतीनें करतात. सध्या हिंदी कंपन्यांत एकूण ५५ कोटि रुपयांच्या शिलकीपैकीं ३८ कोटि रुपये, म्हणजे सुमारें ७०% रकम सरकारी आणि इतर रोख्यांतच गुंतलेली आहे. खालील तक्त्यांत हिंदी कंपन्या आपले पैसे कसे गुंतवितात हें शतमानानें दाखविलेलें आहे:—

### हिंदी कंपन्या पैसे कसे गुंतवितात ?

| | १९२६ | १९३० | १९३४ | १९३७ |
|---|---|---|---|---|
| गहाणावर | ४ | ३ | ४ | ४ |
| पॉलिसीवर | ६ | ८ | ९ | ९ |
| स्टॉक एक्सचेंजवरील रोखे | ९७ | ७० | ६४ | ६८ |
| हिंदी कंपन्यांचे भाग | — | ३ | ५ | ६ |
| जमीन आणि घरें | ५ | ५ | २ | ४ |
| इतर | ६ | ११ | १३ | ९ |

हिंदी कंपन्यांस त्यांचे पैशावर, प्राप्तीवरील कर वजा जातां, निवळ व्याज काय पडलें, हें खालील तक्त्यांत दाखविलें आहे:—

| | १९३३ | १९३४ | १९३५ | १९३६ | १९३७ |
|---|---|---|---|---|---|
| व्याजाचा दर:— | ५·१७ | ५·०८ | ४.९३ | ४·६९ | ४·७६ |

---


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची पांचवी साधारण सभा रविवारीं ता. २५ फेब्रुवारी १९४० रोजीं सायंकाळीं ५ वाजतां (स्टॅं. टा.) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

(१) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९३९ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक, आणि डायरेक्टरबोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

*(२) डिव्हिडंड मंजूर करणें.

(३) निवृत्त होणाऱ्या (फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या) तीन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

(४) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(५) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाच्या हुकुमावरून,

पुणें शहर. }
ता. २०-१-१९४० }

एम. व्ही. गोखले
मॅनेजर

टि. प.—बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फरबुकें ता. २२-२-४० ते २९-२-४० (दोन्ही दिवस धरून) बंद रहातील.

---

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर ते बुधवार ता. १३ मार्च १९४० पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर त्यांजकडे पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## १९३९

### रुपया, पौंड, डॉलर आणि फ्रँक ह्यांची हुंडणावळ

| महिना | रुपया–पौंड पेन्स | पौंड–डॉलर डॉलर | पौंड–फ्रँक फ्रँक |
|---|---|---|---|
| ५ जानेवारी | १७ ३१/३२ | ४·६३ | १७६·६५ |
| २ फेब्रुवारी | १७ २९/३२ | ४·६७ | १७६·९५ |
| १ मार्च | १७ २९/३२ | ४·६८ | १७६·९१ |
| ६ एप्रिल | १७ ७/८ | ४·६८ | १७६·७३ |
| ४ मे | १७ २९/३२ | ४·६८ | १७६ ७३ |
| १ जून | १८ २७/६४ | ४·६८ | १७६·७३ |
| ६ जुलै | १८ ५७/६४ | ४·६८ | १७६·७१ |
| ३ ऑगस्ट | १७ ३१/३२ | ४·६८ | १७६·७१ |
| ४ सप्टेंबर | १७ २९/३२ | ४·०४ | १७५·० |
| ५ ऑक्टोबर | १७ २९/३२ | ४·०४ | १७६·० |
| २ नोव्हेंबर | १७ ३१/३२ | ४·०४ | १७६·० |
| ३ डिसेंबर | १७· ३५/६४ | ४·०४ | १७६·० |

### सोन्याचा आणि चांदीचा भाव

| महिना | सोन्याचा भाव (मुंबई) रु. | आ. | पै. | चांदीचा भाव (मुंबई) रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ जानेवारी | ३७ | ४ | ० | ५१ | १३ | ० |
| २ फेब्रुवारी | ३७ | २ | ९ | ५१ | १५ | ० |
| १ मार्च | ३६ | १५ | ० | ५२ | १० | ० |
| ६ एप्रिल | ३७ | १ | ६ | ५२ | ७ | ० |
| ४ मे | ३७ | ० | ९ | ५३ | ३ | ० |
| १ जून | ३७ | ३ | ० | ५२ | १० | ० |
| ६ जुलै | ३७ | २ | ० | ४७ | ५ | ० |
| ३ ऑगस्ट | ३७ | १ | ६ | ४४ | ५ | ० |
| ४ सप्टेंबर | ३९ | २ | ९ | ५३ | ८ | ० |
| ५ ऑक्टोबर | ४० | १४ | ० | ५६ | ० | ० |
| २ नोव्हेंबर | ४१ | ११ | ३ | ६० | ११ | ० |
| ३ डिसेंबर | ४२ | ६ | ० | ६७ | १२ | ० |

### सरासरी बँक रेट

| वर्ष | वार्षिक सरासरी |
|---|---|
| १९२४ | ६·७ |
| १९२५ | ५·६ |
| १९२६ | ४·८ |
| १९२७ | ५·७ |
| १९२८ | ६·२ |
| १९२९ | ६·३ |
| १९३० | ५·९ |
| १९३१ | ७·० |
| १९३२ | ५·० |
| १९३३ | ३·५ |
| १९३४ | ३·५ |
| १९३५ | ३·५ |
| १९३६ | ३·० |
| १९३७ | ३·० |
| १९३८ | ३·० |
| १९३९ | ३·० |

### ट्रेझरी बिलांची विक्री आणि परतफेड

| महिना | विक्री लक्ष रु. | परतफेड लक्ष रु. | बाकी लक्ष रु. |
|---|---|---|---|
| सुरवातीची, १ जानेवारी, १९३९ रोजीं बाकी:— | | | ३०,४८ |
| जानेवारी | ६७१ | ६५० | ३०,६८ |
| फेब्रुवारी | ९५४ | १२८९ | २७,३३ |
| मार्च | १०६४ | १११८ | २६,७९ |
| एप्रिल | ५८३ | ६६२ | २६,०१ |
| मे | ७७६ | ९७४ | २४,०३ |
| जून | १००० | ९१४ | २४,९० |
| जुलै | १०९० | ७३३ | २८,४६ |
| ऑगस्ट | १२७६ | ७४६ | ३३,७६ |
| सप्टेंबर | १०१३ | १००० | ३३,९० |
| ऑक्टोबर | १६८५ | १०९० | ३९,६८ |
| नोव्हेंबर | १०८३ | १२४८ | ३८,०२ |
| डिसेंबर | ७०० | ८६३ | ३६,४० |

### क्लिअरिंग हौसेसमधील उलाढाल

| (रु.) | १९३७ कोटि लक्ष | १९३८ कोटि लक्ष | १९३९ कोटि लक्ष |
|---|---|---|---|
| कलकत्ता | ९९२ ५० | ९१४ ५८ | १०७६ ११ |
| मुंबई | ८३६ ६८ | ७८७ ३४ | ८२९ ५४ |
| मद्रास | १०९ २८ | १०१ ४५ | ९७ २१ |
| कराची | ३६ ४५ | ३२ २० | ३५ ५४ |
| कोलंबो | ११६ ६६ | १०८ १५ | ११८ २६ |
| रंगून | ८७ ६८ | ७८ ३४ | ९४ ७८ |
| लाहोर | ११ ९१ | १० ४४ | १० ८१ |
| कानपूर | ११ ८९ | १० ०८ | १२ ५२ |
| एकूण | | | २२,७४ ७७ |

### मुंबई प्रांतांतील पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट

मुंबई प्रांताच्या पब्लिक वर्क्स खात्यानें १९३८-३९ मध्ये १ कोटि, १९३/४ लक्ष रुपये खर्च केले, त्यापैकी २७१/४ लक्ष रुपये पेट्रोल टॅक्स फंडापैकी होते. १९३७-३८ मध्ये ह्या खात्यानें एकूण १ कोटि, २२३/४ लक्ष रुपये खर्च केले होते. रिपोर्टाचे वर्षी केवळ रस्तेदुरुस्तीवरच २८१/४ लक्ष रुपये खर्च झाले. इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टाखाली फक्त एकच नवीन इलेक्ट्रिक लायसेन्स मंजूर करण्यांत आलें. वीज कंपन्यांच्या दरांबाबत चौकशी करण्यासाठी सरकारनें एक कमिटी नेमली होती, तिच्या शिफारसींस अनुसरून सरकारनें वीज कंपन्यांशीं दर उतरविण्याबाबत बोलणीं चालू केलीं आणि त्यांनीं विजेचे दर उतरविण्याचें मान्य केलें. सबंद प्रांतांत स्वस्त आणि मुबलक विजेचा पुरवठा कसा करतां येईल, ह्याविषयीं सूचना करण्यासाठी सरकारनें आपला इलेक्ट्रिकल इंजिनियर आणि डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांस चौकशी करण्याचें काम सांगितलें. त्यांचा रिपोर्ट अद्याप सरकारचे हातीं यावयाचा आहे. मुंबई प्रांतांत एकून ६,१२७ मैल लांबीचे खडीचे रस्ते पब्लिक वर्क्सखात्याचे ताब्यांत आहेत. लोकलबोर्डांकडे ४,००२ मैल लांबीचे खडीचे रस्ते आहेत. प्रांतिक खात्याकडे आणि लोकलबोर्डांकडे खडी न घातलेले असें अनुक्रमें ४७१ आणि ९,८३७ मैल लांबीचे रस्ते आहेत.

### भारतीय कलावैभव प्रदर्शनाचें वर्णन

वरील प्रदर्शनानें २००० चौरसफूट जागा व्यापिली आहे. दिवाणखाना मोठा प्रशस्त आहे. विजेची रोषणाई देशी दिव्यांनीं केली आहे व दिव्यांचेसाठीं पैसाफंड कांचशाळेंत तयार झालेल्या गोल व चौरस हंड्या लाविलेल्या आहेत. दिवाणखान्यांत शिशवीच्या व वेतांच्या खुर्च्या प्रेक्षकांच्यासाठीं मांडिलेल्या आहेत. प्रदर्शन सकाळीं ७|३० पासून रात्रीं ७|३० पर्यंत उघडें असतें. तें पहावयास आबालवृद्ध स्त्रीपुरुष रोज येत असतात. सर्व वस्तूंची मांडणी मोठी चित्ताकर्षक आहे. जागोजाग शिक्षणप्रद माहिती दिली आहे. (१) ब्रह्मदेशांतील स्त्रियांची कामगिरी काष्ट–तरंग व इतर कामें, (२) आचरेकर यांचा नलिका-तरंग, (३) विझगापट्टण येथील हस्तिदंती कामें, (४) लखनौ येथील मातीचीं चित्रें, (५) म्हैसूर येथील शिशवीवर हस्तीदंत बसविलेल्या पेट्या व इतर कारागिरी, (६) हैद्राबाद संस्थानचीं कामें, (७) सहराणपूर येथील शिशवीचे कोरीव पडदे, (८) वरंगळ येथील गालिचे, (९) येरवडा येथील गालिचे, सतरंज्या व वेतकाम, (१०) कलकत्त्याचें "उषा" शिवणयंत्र, (११) मोरादाबाद येथील रंगित नक्षीचीं पितळी नित्योपयोगाचीं व शोभेचीं भांडीं, (१२) १८८८ सालांतील प्रदर्शनांतून जमलेले कारागिरीचे नमुने, (१३) जोधपूर संस्थानच्या संगमरवरी दगडाच्या चित्रें, तबकें, जनावरें वगैरे वस्तु, (१४) ओरिसा प्रांतांतील शिंगाच्य' वस्तु, (१५) मद्रास येथील कोराई गवताच्या तलम चटया' (१६) पैठण येथील सुप्रसिद्ध पैठण्या, (१७) बेदरचीं सुप्रसिद्ध कामें, (१८) मेयो स्कूल ऑफ् आर्टमध्यें तयार झालेलीं कामें, विजेच्या दिव्यांच्या शेडस, उंटाच्या पोटांतील कातड्याचे विजेचे दिवे लावण्याचे बुधले, (१९) कारवार जिल्ह्यांतील काथ्याचीं तरटें व चंदनी व हस्तीदंती कामें, इ. इ.

---

### रिझर्व्ह बँकेचे भाग धारण करण्याची मर्यादा

रिझर्व्ह बँकेचे भाग थोड्या लोकांचे हातांत एकत्रित कसे होऊं लागले आहेत, ह्याची माहिती "अर्था"त मागें येऊन गेलेलीच आहे. अधिकांत अधिक लोकांच्या हातांत रिझर्व्ह बँकेचे भाग रहावे हा मूळ उद्देश. ते भाग कांहीं लोकांनीं काबीज करून ठेवण्याचें धोरण अंगीकारल्यास तो उद्देश सफळ होणें शक्य नाहीं. भागीदारांची संख्या १९३५ सालीं ९२ हजार होती, ती आतां ६० हजार सुद्धा नाहीं! ही प्रवृत्ति थांबविण्यासाठीं, कोणत्याहि भागीदारानें २०० भागांपेक्षा अधिक भाग धारण करतां कामा नये, अशी रिझर्व्ह बँक ॲक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल हिंदुस्थान सरकार मध्यवर्ती असेंब्लीपुढे मांडणार आहे असें समजतें. रिझर्व्ह बँकेचें भांडवल ५ कोटि रुपयांचें असून प्रत्येक शेअर १०० रुपयांचा आहे.

---

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १४ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १४ आ. ११ पै. इतका पडला.

### बिहारमध्यें कोळसा सांपडले

बिहारमध्ये कोळशाच्या खाणी सांपडल्या आहेत. ह्या खाणींतील मैंगॅनाइटपासून विजेच्या सहायानें एकदम पोलाद करतां येण्याजोगें आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवंडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पंचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोला („ „) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

### कंपनीच्या विमेदारांना मिळणारे फायदे

कंपनीची अल्पावधींत झालेली वाढ आणि उत्कर्ष यांमुळें कंपनीच्या विमेदारांचें ओघानेंच अधिक हित झालेलें आहे. कंपनी आपल्या विमेदारांशीं इतर कंपन्यांच्या मानानें अधिक सहानुभूतीनें आणि उदारपणानें वागते. विमेदारांच्या दृष्टीनें हा मोठाच फायदा होय. याशिवाय विमेदारांना निरनिराळ्या सवलती कंपनीनें दिलेल्या आहेत. त्यांतील कांहीं खालीं नमूद केल्या आहेत.

(१) वार्षिक हप्त्यांत २॥ टक्क्यांची सूट.

(२) दहा हजारांचे विम्यास दर हजारीं हप्त्यांत आठ आणे सूट व वीस हजारांचे व त्यापुढील विम्यास दर हजारीं एक रुपयाची सूट. मात्र हे विमे एकाच विमापत्राखालीं घेतलेले पाहिजेत.

(३) युरोपांतील निवासास हप्त्यांत सूट.

(४) विमापत्रकें पुनः सुरू करण्याचे बाबतींत विशेष सवलती.

(५) जादा हप्ता न घेतां कायमच्या पंगुपणाचा फायदा.

(६) कॉन्व्हर्शन स्कीम. (रद्द पॉलिसी चालू करण्याची सवलतीची योजना).

(७) विमेदारांचे हप्ते आपोआप भरले जावेत म्हणून सेव्हिंग बँक खात्याची सोय.

(८) हप्ते निश्चित भरले जावेत म्हणून कायम ठेवींची व्यवस्था.

(९) मुलांचे विवाह, शिक्षण इत्यादि बाबतींतील फायदेशीर विमा कोष्टकें.

(१०) सर्वसंग्राहक विम्याची नाविन्यपूर्ण योजना.

---

### प्रो. काळे ह्यांचें वुइलिंग्डन कॉलेजांत व्याख्यान

वुइलिंग्डन कॉलेजांतील इतिहास व अर्थशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समितीची वार्षिक सभा गेल्या शनिवारीं झाली. त्या प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. समितीचें कार्य आणि अध्यापकांचे विद्यार्थ्यांशीं असलेले प्रेमाचे संबंध ह्यांचा गौरव करून प्रो. काळे ह्यांनीं "युद्धाचे हिंदुस्थानावर परिणाम" ह्या विषयावर भाषण केलें. राजकीय घटना, उद्योगधंदे व व्यापार ह्यांची स्थिति युद्धामुळें कशी होणार आहे ह्याचें शब्दचित्र व्याख्यात्यांनीं रेखाटलें आणि हिंदुस्थान सरकारनें योजिलेल्या फाजील नफ्यावरील कराच्या योजनेवर प्रतिकूल टीका केली. विशिष्ट प्रकारांच्या मालास, तो युद्धोपयोगी आहे म्हणून विलक्षण मागणी उत्पन्न झाली आहे आणि त्याचे संबंधांतील व्यवसाय तेजींत आहेत. युद्धसमाप्तीनंतर ह्या धंद्यांस मंदी येईल. उत्पादक शक्तीच्या मानानें लोकांची क्रयशक्ति अत्यंत मर्यादित होईल आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा भयंकर वाढेल. ह्या परिस्थितीचा प्रत्येक राष्ट्रानें विचार करून आपलें आजचें व पुढील आर्थिक धोरण आंखलें पाहिजे. ह्याप्रमाणें भाषण करून प्रो. काळे ह्यांनीं वुइलिंग्डन कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक ह्यांचें अभिनंदन केलें.

---


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. म. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियांची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९१A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.


सुखाचा शोध
मिनर्व्हा १६ वा आठवडा

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१०,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंगी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल......... | रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल......... | रु. | ३,०४,१०० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. | १,५२,०१० |

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन; श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

## — चालू हंगामाची नवी साखर सुरू झाली —

# शुभ्र व दाणेदार साखऱ्या.

## अंदाजी बारा लक्ष रुपयांची साखर तयार होईल.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
१८०, सदाशिव पेठ, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजन्ट.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०—९ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९१—२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १००–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८८–१५ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९४—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०३—२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११०—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२०—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३८—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०१—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३४—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४८२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—४ |
| **वीज** | |
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२९–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १८३—२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४८७—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६०—० |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २२९—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१–१० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३६—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४१४५–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १३६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | २०१५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १२४—४ |




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

हेड ऑफिस : जळगांव ( पू. खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

## NEW BUSINESS

**Last year 1937-38**
**Exceeds**
**Rs. 3 CRORES**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध"या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड : : नागपूर शहर



# विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे सल्ल्यावरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगां-वर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कसकी, अकालीं गर्भपात होणें, झुरणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्ये असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

श्री हेल्थ फॉरिन एजन्सीज. ( डि. डे. १ )
२५।३।३ माधवविलास, शिवाजीनगर, पुणें २.



# N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.



# अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. धुं. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ९००, किंमत ६ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।१ ब, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.